# महाराष्ट्र वार्ता पत्र

## जुलै २०२०

(खाजगी वितरणासाठी ई वार्तापत्र)

फेडरेशन ऑफ फिल्म सोसायटीज ऑफ वेस्टर्न रिजन

वर्ष सहा
Volume-VI
अंक
3



न्यु नायगांव मुनिसिपल स्कूल, रु. नं.२, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४ ● दूरध्वनी ०२२-२४१३३१९१● Email : ffsiwr@gmail.com



संस्थापक अध्यक्ष : सत्यजित राय ● अध्यक्ष : किरण व्ही. शांताराम ● उपाध्यक्ष : सुधीर नांदगांवकर - संपादक


# ५१वा भारताचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नोव्हेंबरमधेच




**पोस्टर**




**माहितीमंत्री प्रकाश जावडेकर पत्रकार परिषदेत**

भारत सरकार गोव्यात आयोजित करत असलेला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यावर्षी भरणार की नाही अशी शंका अनेकांच्या मनांत होती. कारण कोविड-१९ मुळे युरोपातले कान्स, कार्लोव्होवारी, मॉस्को इ. अनेक महोत्सव केवळ ऑनलाईनवर भरविण्यात आले. कान्स महोत्सवाचा मार्केट सेक्शनही २२ ते २६ जून मधे ऑनलाइन भरविण्यात आला. परंतु या सगळ्या शंकाना आता पूर्ण विराम मिळाला असून माहिती आणि प्रसार मंत्री प्रकाश जावडेकर यांनी २१ जूनला कान्समधील इंडिया पॅव्हेलियनचे उद्घाटन करतांना भारताचा ५१वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २० ते २८ नोव्हेबरमधे गोव्यात थिएटरमधे भरणार असल्याची घोषणा केली. इतकेच नव्हे तर महोत्सवाचे पोस्टरही प्रकाशीत केले. यामुळे ५१वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव होणार असल्याचा दिलासा चित्रपट रसिकांना मिळाला आहे.

**सत्यजित राय जन्मशताब्दी वर्ष**

माहिती मंत्रालयाचे सेक्रेटरी अमित खरे यांनी त्याच पत्रकार परिषदेत अशी माहिती दिली की ५१वा महोत्सवात सत्यजित राय यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात येईल. त्याखेरीज मार्केट सेक्शन, चर्चासत्रे, ओपन फोरम इ. विविध कार्यक्रम सादर केले जातील.

# इटालीयन दिग्दर्शक फेलीनीची जन्मशताब्दी



इटालियन दिग्दर्शक फेडरिको फेलीनीचे २०२० हे जन्मशताब्दी वर्ष आहे. २० जानेवारी १९२०ला जन्मला आणि १९९३ला ७३व्या वर्षी निधन पावला. १९४५ को १९९२ या काळात फेलीनी कार्यरत होता. फेलीनीनें लेखन उमेदवारी इटालियन नववास्तववादी दिग्दर्शक रॉबर्टो रोझेलीनी यांच्यासोबत सुरु केली प्रथम "रोम ओपन सिटी" आणि नंतर "पेईसा"हे तो दोन चित्रपट. त्यांची पटकथा फेलीनीची होती. दोन्ही चित्रपटांसाठी पटकथा लेखक म्हणून फेलीनीला ऑस्कर नॉमिनेशन मिळाले.

यातून फेलीनीचा आत्मविश्वास दुणावला आणि तो दिग्दर्शनाकडे वळलाय "व्हारायटी लाइटस्" हा त्याचा पहिला चित्रपट वर्ष होते १९५०. पण त्याने तो अल्बर्ट लॅटुडा यांच्या सोबत दिग्दर्शित केला होता. आणि १९५२ मधे "व्हाइट शेक" दिग्दर्शित केला. नंतर फेलीनीने मागे वळून पाहिले नाही. एका पेक्षा एक सुंदर जीवनदर्शी चित्रपट त्याने दिले.

ला स्ट्राडा (१९५४), नाईट ऑफ कॅबेरीया (१९५७), ला डोलसेवेटा (१९६०), एट ॲण्ड हाफ (१९६३), रोमा (१९७२),अमरकोड (१९७३), सिटी ऑफ वुमेन (१९८३).

फेलीनीला तीन वेळा विदेशी ऑस्कर मिळाले. अमरकोड (१९७५), एट ॲण्ड हाफ (१९६४) आणि नाईट ऑफ कॅबेरिया (१९५७) हे ते तीन चित्रपट कान्समधे "ला डोल्से व्हिला"ला १९६० साली पाम डी ओर पारितोषिक मिळाले.

१९८५ साली व्हेनिस मधे गोल्डन लायन जीवनगौरव पारितोषिक आणि १९९३ मधे जीवनगौरव पुरस्काराने ऑस्करने त्याचा गौरव केला. जन्मशताब्दीचा पहिला सोहळा ब्रिटीश फिल्म इन्स्टिट्यूटच्या नॅशनल थिएटरमधे फेब्रु. २०२० ला झाला.

# ४४वा हाँगकाँग चित्रपट महोत्सव ऑगस्टमधे

कोविड महामारीमुळे युरोपातले चित्रपट महोत्सव रद्द झाले पण आशियातले महोत्सव सुरु होणार आहेत. हाँगकाँगचा चित्रपट महोत्सव दरवर्षी मार्चमधे भरतो पण कोरोना महामारीमुळे चीनने तो पुढे ढकलला. पण आता ४४वा महोत्सव २२ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या सप्ताहात भरणार आहे.

# इन्स्टिट्यूटचा ऑन लाइन कोर्स

पुण्याच्या फिल्म ॲण्ड टेलीव्हिजन इन्स्टिट्यूटने "आलोचना : सिनेमा आणि समीक्षकांची दृष्टी" हा २० दिवसांचा ऑन लाईन कोर्स ३ ते २८/२०२० या काळात आयोजित केला आहे. राजुल शहा या कोर्सची संचालिका आहेत. त्या मूळ फिल्म इन्स्टिट्यूटच्या पदवीधर आहेत.

# अदूर गोपाल कृष्णन ८० नाबाद

अदूर गोपाल कृष्णन नें ३ जुलै २०२० रोजी ८०व्या वर्षात पदार्पण केले. भारतीय सिनेमांत शुद्ध सिनेमाचे बीज पेरले सत्यजित राय यांनी आणि अदूरने ते केरळच्या भूमित नेले.

आपल्या आईबापांचे अदूर हे सातवे अपत्य पण त्याच्या जन्मानंतर वडिल त्याच्या आईपासून विभक्त झाले. स्वाभाविकच अदूरवर त्याच्या आईनेच म्हणजे मथाथू गौरी कुजंम्माने संस्कार केले. त्याला वाढवला. आईच्या प्रभावामुळे अदूरला सत्यजित राय यांचा "अपराजितो" हा पथेर पांचाली नंतरचा दुसरा चित्रपट अधिक आवडतो. अशी कबुला अदूरने आपल्या पुस्तकात दिली आहे.

लहानपणापासूनच अदूरला रंगभूमीचे आकर्षण होते. मात्र, त्याचे काका २/४ चित्रगृहांचे मालक होते. त्यामुळे अदूरला चित्रपट पहायला मिळायचे. पण त्याला त्या बालवयात वाटायचे सिनेमा वास्तवापासून दूर आहेत. आपल्या दैनंदिन जीवनांशी रंगभूमीचे नाते अधिक आहे. विद्यार्थी असतांना अदूरने नाटके लिहली. दिग्दर्शन केली. त्यांत भूमिकाही केल्या. बी. ए. ची पदवी त्याने गांधीग्राम रुरल इन्स्टिट्यूटमधून त्याने घेतली. १९६२ साली पुण्याला फिल्म इन्स्टिट्यूट सुरू झाली तेव्हा त्याने तेथे ॲडमिशन घेतली. आणि तरीही त्याचे नाट्यप्रेम कमी झाले नाही. वर्षभर तो इन्स्टिट्यूटच्या ग्रंथालयात नाट्य संबंधी वाचन करीत राहिला. १९६३ साली ऋतिक घटक इन्स्टिट्यूटचे उपप्राचार्य म्हणून आले आणि प्रा. सतीश बहादूर चित्रपट रसग्रहण शिकवायला आले. या दोन गुरुवर्यांनी सिनेमा प्रेम अदूरमधे जागृत केले. आणि अदूरला सिनेमा रुची निर्माण झाली. पुढच्या आयुष्यात त्याने रंगमंचाकडे वळून कधी पाहिले नाही. दिग्दर्शक हा शब्द नाटकांतून सिनेमात आलाय तो चित्रपट निर्मितीची सारी प्रक्रीया व्यक्त करत नाही. "फिल्म मेकर"हा शब्दच योग्य आहे. असे मूलभूत विचार घेऊन अदूरने १९६५ मधे दिग्दर्शनाचा डिप्लोमा घेऊन



फिल्म इन्स्टिट्यूटला रामराम केला.

**फिल्म सोसायटी**

अदूर त्रिवेंद्रमला पोचला तेव्हा मल्याळम आणि तामीळ सिनेमा तद्दन खोटा आणि मेलोड्रामाने भरलेला होता. या प्रेक्षकाला आपला नवा शुद्ध सिनेमा कसा आवडेल यासाठी अदूरने सत्यजित राय यांचे मॉडेल वापरायचे ठरविले. रायनी १९४७ सालीच कलकत्ता फिल्म सोसायटीची स्थापना केली आणि १९५५ला पथेर पांचाली प्रकाशित झाला. "पथेर पांचाली"ला प्रेक्षक प्रतिसाद उदंड मिळाला.

हे १९६५ साल होते. अदूरने सत्यजितचा मार्ग अनुसरायचे ठरविले प्रेक्षकांची अभिरुची सुधारण्याखेरीज नवचित्रपट काढणे सोयीचे नव्हते. केरळात तेव्हा साक्षरता ८० टक्के होती पण फिल्म सोसायटी कोणालाच ठाऊक नव्हती. अदूरने मित्र जमविले आणि चित्रलेखा फिल्म सोसायटी स्थापन केली. नॅशनल फिल्म आर्काइव्ह कडून १६ एम.एम.च्या फिल्म आणून तो दाखवायचा. कधी कधी तर अदूर स्वत: १६ एम.एम.प्रोजेक्टर ऑपरेट करायचा. अदूर याबाबत सांगतो की प्रेक्षक अभिरुची उंचावणे हे फिल्म सोसायटीचे उद्धीष्ट होतेच पण त्याच बरोबर जागतिक सिनेमातले नवे प्रयोग पहाणे हा माझा उद्देश होता.

थोड्याच काळात चित्रलेखाने बाळसे धरले. सदस्य संख्या २००वर पोचली. प्राध्यापक, वकील, विचारवंत लेखक असे अभिजन लोक सदस्य झाले. नंतर अन्य शहारांतून केरळमधे फिल्म सोसायट्या सुरु झाल्या. साक्षरता असल्यामुळे इंग्रजी सबटायटल वाचायची अडचण नव्हती. हे सारे घडे पर्यंत १९६७ साल उजाडले. अदूरला चित्रपट निर्मितीचे वेध लागले. "चित्रलेखा"च्या कार्यकारी समितीत त्याने ठराव मांडला. त्यावर कुलथून भास्करन नायर म्हणाला फिल्म सोसायटीने चित्रपट काढण्यापेक्षा आपण को-ऑपरोटिव्ह सोसायटी काढू. आणि चित्रलेखा फिल्म को. ऑपरेटिव्हचा जन्म झाला.

या को.ऑपरोटिव्हचा कुलथून भास्करन नायर चेअरमन झाला. अदूरने सोसायटी मार्फत फिल्म फायनान्स कार्पो. कडे भांडवलासाठी अर्ज केला. फिल्म फायनान्स कार्पोरेशनने ३ लाखांचे कर्ज मंजूर केले. आणि अदूर "स्वयंवरम"चित्रपटाच्या पटकथेवर काम करू लागला. शारदा या अभिनेत्रीला त्याने प्रमुख भूमिकासाठी निवडले. शारदा तेव्हा अत्यंत प्रेक्षकप्रिय अभिनेत्री होती. पण थोडक्या मोबदल्यात तिने भूमिका करण्याचे मान्य केले.

१९७२ साली "स्वयंवरम्" प्रकाशित झाला आणि प्रेक्षकांनी त्याचे चांगले स्वागत केले. त्यामुळे फिल्म फायनान्स कार्पो. कर्ज अदूरने फेडून टाकले. त्यानंतर कुलथूर नायर आणि अदूर यांच्यात वाद झाला. त्यामुळे अदूर फिल्म सोसायटीतून बाहेर पडला.

१९७० साली जागतिक सिनेमाचे परीक्षण करणारे पुस्तक अदूरने लिहले त्याचवर्षी केंद्र सरकाने सिनेमा विषयक पुस्तकाला पारितोषिक द्यायला सुरवात केली. पहिलेच पारितोषिक अदूरला मिळाले.

"स्वयंवरम"नंतर केरळमधे समांतर सिनेमाला प्रारंभ झाला. अदूरला २००६ मधे पद्‌भूषण पुरस्कार मिळाले. दादासाहेब फाळके पुरस्कारानेही त्याचा गौरव झाला.

**- सुधीर नांदगांवकर**

# समीक्षकांचे ग्रॅण्ड प्री -१९ गुजराती "हेल्लोरे" चित्रपटात

फीप्रेस्की इंडिया ही आंतरराष्ट्रीय फेडरेशन ऑफ फिल्म क्रिटिक्स या संघटनेची भारतीय शाखा आहे. या शाखेतर्फे यावर्षी सर्व भारतीय भाषातील चित्रपट स्पर्धेसाठी मागवून ग्रॅण्डप्री-१९ हा समीक्षकांचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. असे सेक्रेटरी प्रेमेन्द्र मुजुमदार यांनी जाहिर केले. तामीळ, मल्याळम, आसामी, गुजराती, मराठी, खासी, बंगाली. मैथिली, हिंदी इतक्या भाषातील २० चित्रपट होते. हिंदीतला आर्टिकल-१५ आणि मराठीतला "आनंदी गोपाळ" यांचा समावेश होता. गेल्या वर्षी सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळविणाऱ्या "हेल्लोरे"या गुजराती चित्रपटाला समीक्षकांनी पसंती दिली. हेल्लोरे चे दिग्दर्शक अभिषेक मुळातला गुजराती रंगमंचावरचा पण सिनेमात रस निर्माण झाल्यानंतर त्याने व्यावसायिक गुजराती चित्रपटांसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणून काम केले. "हेल्लोरे"हा त्याचा पहिलाच चित्रपट २०१९ च्या अिफीमधील स्पर्धा विभागात त्याला आंतरराष्ट्रीय ज्युरी प्राइझही मिळाले होते.

# ऑनलाइन इटालियन चित्रोत्सव

इटालियन कल्चर सेंटरने १५ऑगस्ट ते ३० ऑक्टोबर असा समकालीन इटालियन चित्रपटांचा ऑनलाईन महोत्सव आयोजित केला आहे.

हा चित्रपट महोत्सव ज्यांना पहायचा असेल त्यांनी media.iicnd@gmail.com वर ई मेल कारावा. म्हणजे सारा कार्यक्रम व लिंक सेंटरला पाठविता येईल. इटालियम सिनेमात रस असणारांनी जरूर ईमेल पाठवावी.